# आ.बच्चु कडू, यशोमती ठाकूर सेफ झोन मध्ये!



## आ.सुलभा खोडके, राजकुमार पटेल, अभिजीत अडसूळ यांची बिकट वाट

## राणा दाम्पत्यांच्या 'खेळी' चे कोण कोण 'बळी' ?





रोहित गासे

*अमरावती,( दि.13 )-लोकसभा निवडणूकीमध्ये नवनित राणा यांना घरी बसविण्याकरिता हातभार लावणाऱ्या आजी-माजी आमदारांचा सूड उगविण्याकरिता जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात रवी राणा आणि नवनित राणा यांनी भाजपा ला हाताशी धरुन पाच मतदारसंघात प्रस्थापितांना कोंडीत पकडण्याकरिता 'खेळी' केली. या खेळीमधून आ.बच्चू कडू आणि यशोमती ठाकूर वगळता इतर तीन आजी-माजी आमदारांची विधानसभेत जाण्याची वाट बिकट झाली आहे. ज्यामध्ये अमरावतीच्या विद्यमान आमदार सुलभा खोडके, मेळघाटचे विद्यमान आमदार राजकुमार पटेल आणि दर्यापूर मतदारसंघातील माजी आमदार अभिजीत अडसूळ यांचा समावेश आहे.*


### हिंदू विरुध्द मुस्लिम राजकारणात खोडकेंची गोची





पश्चिम अमरावती मधील गुन्हेगारी सृष्टीतील लोकांना हाताशी धरुन संजय खोडके पुन्हा एकदा आपल्या पत्नी सुलभा खोडके यांना आमदार करण्याचा प्रयत्न करित असल्याची हवा विरोधकांकडून केली जात आहे. तर हिंदूचे नेतृत्व म्हणून जगदीश गुप्ता यांना रवी राणा यांनीच उभे केल्याचा आरोप खोडके समर्थक गटाकडून केल्या जात आहे. सुलभा खोडके निवडून आल्यास इथला हिंदू व्यापारी धोक्यात येईल अश्या वावड्या उठविल्या जात आहे. त्यामूळे खोडके यांना ही निवडणूक 'सहज' नसल्याचे दिसत आहे.

### दर्यापूरात मतदारसंघात बुंदीलेंचा झेंडा





दर्यापूर मतदारसंघाचा विचार केल्यास महायुतीकडून शिवसेना(उबाठा) उमेदवारी माजी आमदार अभिजीत अडसूळ यांना मिळाली. अडसूळ यांना मात देण्याकरिता भाजपचे माजी आमदार रमेश बुंदीले यांना नावापुरती भाजपमधून बाहेर काढून त्यांना युवा स्वाभिमान पक्षावर निवडणूकीत उभे करण्याची खेळी रवी राणा यांनी खेळली. साम, दाम या दोन्ही गोष्टींचा पुरवठा रमेश बुंदीलेंना होत आहे यात दुमत नाही. बाहेरचे पार्सल आणि हेकेखोर स्वभाव असा ठप्पा विरोधकांनी अभिजीत अडसूळांवर लावल्याने त्यांना मतदारसंघात आपोआपच प्रतिसाद कमी झाल्याचे दिसत आहे. दुसरीकडे उबाठा शिवसेनेचे उमेदवार गजानन लवटे यांची 'दारु विक्रेता' म्हणून डागाळलेली छवी असल्याने ते लढतीत दुसऱ्या क्रमांकावर आले आहे. तर थेट भाजपचा उमेदवार म्हणून बुंदीलेंना प्रदर्शीत केल्या जात असल्याने त्यांचा मतदारसंघात झेंडा सर्वाधिक उंच दिसत आहे. त्यामूळे अडसूळांना आल्या पावली परत जावे लागणार असल्याचे दिसत आहे.

### बच्चू कडू आणि यशोमती ठाकुरांची नवख्यांशी लढत





राजकुमार पटेल, सुलभा खोडके, अभिजीत अडसूळ यांच्याविरुध्द तीनही उमेदवार हे माजी आमदार आहेत. याउलट बच्चू कडू यांच्याविरुध्द राणा दाम्पत्याने अचलपूर मतदारसंघात पाटील मतांचे विभाजन करण्याकरिता भाजपकडून नवखे असलेले प्रविण तायडे यांना उमेदवारी दिली. परंतू तायडे यांच्याकडे मूठभर पाटील मतांशिवाय जनाधार दिसत नाही. अशीच परिस्थिती तिवसा मतदारसंघात आहे, आ.यशोमती ठाकुर यांची भाजपचे नवखे उमेदवार राजेश वानखडे यांच्याशी लढत आहे. गेल्या निवडणूकीत शिवसेनेच्या मेहेरबानीने वानखडे यांनी यशोमती ठाकूर यांना निकराची लढत दिली होती, मात्र यंदा उबाठा शिवसेनाच यशोमती ठाकूर यांच्या पाठीशी आहे. तसेच राजेश वानखडे यांच्या हेकेखोरीच्या स्वभावामूळे त्यांच्याही पाठीमागे जनाधार दिसत नाही. त्यामूळे सध्यातरी बच्चू कडू आणि यशोमती ठाकूर हे सेफ झोनमध्ये दिसत असून राणांची खेळी अचलपूर व तिवसा मतदारसंघात कुचकामी झाल्याचे दिसत आहे.

जिल्ह्यातील अर्धा डझन आजी-माजी आमदारांसाठी डोकेदुखी ठरत असलेले रवी राणा यांची तत्कालीन खासदार पत्नी नवनित राणा यांना घरी बसविण्याकरिता महायुती, महाविकास आघाडी व प्रहार पक्षातील आजी-माजी आमदारांनी मोट बांधून आपआपल्या परिने हातभार लावला होता. आता या आमदारांचा सूड उगविण्याची संधी विधानसभा निवडणूकीच्या रुपाने राणा दाम्पत्यांना मिळाली आहे. देशातील सर्वात मोठा सत्ताधारी भाजप पक्ष गाठीशी असल्याने या संधीचे सोने करण्याकरिता राणा दाम्पत्याने मेळघाट, अचलपूर, दर्यापूर, तिवसा आणि अमरावती मतदारसंघामध्ये वेगवेगळ्या रुपाने खेळी रचली. आता तीन आजी-माजी आमदार या 'खेळी' चे 'बळी' पडणार असल्याचे दिसत आहे.

### मेळघाटात केवल 'राम', प्रहार चे 'राजकुमार' धोक्यात





आदीवासी बहुल मेळघाट मतदारसंघात ऐन लोकसभा निवडणूकीच्या हंगामात काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश करणे केवलराम काळे यांना लाभदायक ठरले आहे. प्रहार सोडून महायुतीमधून शिंदे गटाच्या शिवसेनेची उमेदवारी घेवून राणांची योजना फसविण्याचा अयशस्वी प्रयत्न विद्यमान आमदार राजकुमार पटेल यांनी केला. परंतू या प्रयत्नात ते 'घर' चे आणि 'घाट' चे कुठलेच राहले नव्हते. अखेर ते परत प्रहारमध्ये गेले. मात्र या प्रयत्नात त्यांची चांगलीच 'नाचक्की' झाली. दुसरीकडे भाजप उमेदवार केवलराम काळे शांत, संयमी उमेदवार म्हणून मतदारांच्या पसंतीस पडत आहेत. मेळघाट मध्ये भाजपचे केवल 'राम' जप सुरु असल्याने राजकुमार ही राणांच्या या खेळीचे बळी पडताना दिसत आहे.

## विवाहित महिलेची नदीत उडी घेऊन आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.13 )** - येथील विवाहीत महिलेने पुलावरून नदीत उडी घेऊन आपले जीवन संपवल्याची घटना बुधवारी (दि.13) सकाळी उघडकीस आली. शहरातील गुजरी बाजार भागातील रहिवासी प्रकाश सदातपुरे यांची पत्नी कीर्ती प्रकाश सदातपुरे (वय 58) या महिलेने मायवाडी नजीक असलेल्या माडु नदीच्या पुलावरून उडी घेऊन आत्महत्या केली. सदर घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली. या प्रकरणी फिर्यादी पतीच्या तक्रारीवरून पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे. मृतक महिलेच्या मागे पती, दोन मुले असा परिवार आहे. असल्याने जनमाणसात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## मोर्शी विधानसभा उमेदवारांनी सादर केला खर्च

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.13 )** - मोर्शी विधानसभा मतदारसंघात नामनिर्देशित उमेदवारांच्या खर्चाची दुसरी तपासणी सोमवार, दि. 11 नोव्हेंबर रोजी तहसिल कार्यालय सभागृह येथे पार पडली. यावेळी सर्व 19 उमेदवारांनी खर्च सादर केला. दुसरी तपासणी खर्च निरीक्षक डॉ. उमा माहेश्वरी यांचे मार्गदर्शनाखाली पार पडली. लेख्यांच्या तपासणीवेळी एकूण 19 उमेदवारांपैकी 19 उमेदवार उपस्थित राहिले. सदर खर्च तपासणीवेळी खर्च नोंदवहीत नोंदविलेला खर्च व खर्च सनियंत्रण पथकाव्दारे नोंदविण्यात आलेला खर्च यात असलेली तफावत उमेवारांनी मान्य करून उमेदवारांच्या खर्च लेख्याचा ताळमेळ घेण्यात आला. उमेदवारांच्या लेख्याची तिसरी तपासणी दि. 15 नोव्हेंबर रोजी तहसिल कार्यालय मोर्शी येथील सभागृहात होणार आहे.

## आईजी, सीपी, डीसीपी, एसीपींनी केले मतदान

### 1436 पेक्षा अधिक पोलिस कर्मचाऱ्यांचे मतदान



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )** - विधानसभा निवडणूकीतील पोस्टल बॅलेट मतदान प्रक्रिया सुरु झाली असून, शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पोस्टल बॅलेट मतदान सुरु केले आहे. यामध्ये आयजी रामनाथ पोकळे, सीपी नवीनचंद्र रेड्डी, डीसीपी सागर पाटील, कल्पना बारवकर, गणेश शिंदे, एसीपी अरुण पाटील यांच्यासह आदी अधिकार्यांनी तहसिल भवनात जाऊन मतदानाचा हक्क बजावला.

निवडणुकीच्या अनुषंगाने शासकीय अधिकारी व कर्मचार्यांना सजग राहावे लागते. त्यांना दुसऱ्या जिल्ह्यात जाऊन कर्तव्य बजावावे लागते. त्यामुळे त्यांचे मतदान हे पोस्टल बॅलेट पध्दतीने केले जाते. अमरावती विधानसभा मतदार संघासाठी मतदान प्रक्रिया ही तहसिल कार्यालयात आणि बडनेरा मतदार संघासाठी केशवराव भोसले सभागृहात ही मतदान प्रक्रिया सुरु आहे. आतापर्यंत पोस्टल बॅलेटमध्ये 1436 पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांची मतदान प्रक्रिया सुरु आहे.

## अवघ्या 20 मिनिटात जमा झाली 51 हजारांची देणगी





### जनतेच्या धनशक्तीने प्रिती बंड यांचा लढा मजबूत

### गावखेड्यातील नागरिकही 100 रुपयांपासून लावताहेत हातभार

### सुदाम काका, बच्चु कडू नंतर प्रिती बंड नी रचला इतिहास

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.13 )**- लोकनेते माजी आमदार स्व.संजय बंड यांच्या पत्नी व बडनेरा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार प्रिती संजय बंड यांच्या मागे जनता आपल्या खिशातील पैश्यांसह उभी झाली असल्याने बडनेरा मतदारसंघात खऱ्या अर्थ्याने जनशक्तीविरुध्द धनशक्ती असा हा सामना दिसत आहे. जाईल तिथे लोक प्रिती बंड यांच्याकरिता देणगी जमा करताना दिसत आहे. बुधवार(दि.13) रोजी येथील पार्वती नगर अवघ्या 20 मिनिटात येथील लोकांनी तब्बल 51 हजाराची देणगी प्रिती बंड यांच्या लढ्याकरिता जमा केली. स्व.संजय बंड मित्र परिवार या नावाने ही रक्कम जमा करण्यात आली. गावखेड्यातही ग्रामस्थ 100 रुपयांपासून ते हजारो रुपयांपर्यंत स्वयंस्फुर्तीने रक्कम जमा करुन प्रिती बंड यांचा लढा आर्थिक रुपाने मजबूत करित आहेत. यापुर्वी जिल्ह्यात लोकनेते कॉ.सुदाम काका देशमुख, आ.बच्चु कडू यांच्या लढ्याला जनतेने देणगी जमा करुन आर्थिक हातभार लावल्याचा इतिहास आहे, आता या इतिहासात प्रिती बंड यांच्याही नावाची नोंद झाली आहे.

तीन वेळा आमदार असतानाही आपल्या स्वार्थासाठी न जगलेला माणूस म्हणून स्व.संजय बंड यांची ओळख आहे. आजही त्यांच्या घरी गेल्यावर हे दिसून पडते. अत्यंत साधारण व्यक्तीच्या घराप्रमाणे त्यांचे निवासस्थान आहे, आणि अत्यंत साधारण त्यांच्या कुटूंबियांचे राहणीमान आहे. संजय बंड हे खरे लोकनेते होते यात त्यांच्या विरोधकांचेही दुमत नाही.

आता जनता प्रिती बंड यांच्या रुपाने संजय बंड या नावाच्या मागे उभी झाली आहे. बडनेरा मतदारसंघात धनशक्तीच्या जोरावर उमेदवार 'मॅनेज' करणाऱ्या धनाढ्य उमेदवाराविरुध्द जनतेने उभ्या केलेल्या सामान्य महिलेची अपक्ष उमेदवारी असा हा सामना रंगत आहे. एकीकडे पैसे देवून सभेला लोकं जमा करावे लागत आहे, तर दुसरीकडे संजय बंड या नावामागे स्वत- देणगी जमा करुन लोकं उभे राहत आहे. ही बडनेरा मतदारसंघातील परिवर्तनाची लाट असून घराघरातून किराणा वितरक उमेदवाराची खाबूगिरी संपुष्टात येणार असल्याच्या शक्यतेची नांदी आहे.

### प्रिती बंडकरिता बुध्द विहारात 25 हजाराची देणगी

प्रिती बंड कोण्या एका पक्षाच्या, जातीच्या किंवा धर्माच्या उमेदवार राहीलेल्या नसून त्या जनसामान्यांचं नेतृत्व म्हणून समोर आल्या आहे. हिंदू, मुस्लिम, बौध्द, शिख, इसाई अश्या सर्वच धर्मातील जनता तन, मन, धनाने त्यांच्या पाठीमागे उभी आहे. बडनेरा मतदारसंघातील भातकुली तालुक्यातील आसरा या गावात प्रचारा रॅलीदरम्यान आसरा ग्रामस्थ राजेश वानखडे नामक व्यक्तीने बौध्द विहारातून 25 हजार रुपयांची देणगी जमा करुन प्रिती बंड यांच्या लढ्याची ताकद वाढविली. हे वातावरण बडनेरा मतदारसंघातील परिवर्तनाच्या त्सुनामीचे द्योतक असल्याचे जनता सांगत आहे.

## बिलाच्या वादातून वाईन बार चालकावर हल्ला

### दोन हल्लेखोरांविरुध्द गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )** - बिलाच्या वादातून अज्ञात आरोपीने गाडगेनगर पोलिस ठाणे हद्दीतील न्यू कॉटन मार्केट रोडवरील आशीर्वाद बीअर बार अँड रेस्टॉरंटच्या संचालकावर चाकूने हल्ला केला. ही घटना 11 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 6.45 वाजता घडली.

जखमी प्रकाश आसुमल शोभानी (44, कृष्णा नगर गल्ली क्र. 3, अमरावती) यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.11 नोव्हेंबर रोजी सायंकाळी आशीर्वाद बारमधील टेबल क्रमांक 2 वर एक अनोळखी तरुण ग्राहक बसला होता. यावेळी प्रकाश शोभानी हे काउंटरवर ग्राहकांकडून पैसे घेत होते. अज्ञात आरोपींनी दारू आणि काही खाद्यपदार्थ मागितले, त्यावर त्याची ऑर्डर पूर्ण झाली. नंतर बिल



भरण्यासाठी तो काउंटरवर आला असता बिल पाहून वाद घालू लागला आणि निघून गेला. त्यानंतर 5 मिनिटांनी तो काउंटरवर परत आला आणि प्रकाश शोभानी यांच्या छातीवर व पाठीवर चाकूने वार करून तेथून पळ काढला. हॉटेल कर्मचाऱ्यांच्या मदतीने प्रकाश शोभानी यांना तात्काळ राजापेठ येथील खासगी रुग्णालयात नेण्यात आले. तेथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर प्रकाश शोभानी यांच्या फिर्यादीवरून गाडगेनगर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध कलम 118 (2) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# महिलेला खाली पाडून हिसकले मंगळसूत्र

## पोलीस स्टेशनअंतर्गत विर्शी येथे धक्कादायक घटना

### दोन चेन स्नॅचरवर गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 13 )** – शेतातील पायी जाणाऱ्या महिलेला गावाचा पत्ता विचारला. त्यानंतर तिला लाथ मारून खाली पाडून तिच्या गळ्यातील 4 ग्रॅमचे मंगळसूत्र हिसकावून पळून गेल्याची घटना 12 नोव्हेंबर रोजी सकाळी 10.30 वाजता घडली. वलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील विर्शी ते आष्टी रस्त्यावर घडली होती. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन लुटारुंविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



वलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणारी तक्रारदार महिला मंगळवारी सकाळी 10 वाजता शेतात कचरा टाकण्यासाठी जात होती. त्यानंतर विर्शी गावाच्या वेशीवर मोटारसायकलवरून आलेल्या दोन तरुणांनी महिलेला हातखेडा गावाचा रस्ता विचारला. त्यानंतर महिलेने त्याला विरशी गावाचा मार्ग सांगितली. त्यानंतर महिला शेताकडे निघून गेली. यानंतर ही महिला नंदकिशोर खराड यांच्या शेताजवळ आल्यावर दोन्ही तरुण पुन्हा तेथे आले असता, हा रस्ता हातखेडाकडे जातो, असे महिलेने सांगितले.

दरम्यान, मोटारसायकलवर मागे बसलेल्या तरुणाने महिलेला लाथ मारून तिला खाली पाडले. मोटारसायकलवरून खाली उतरल्यानंतर दोन्ही तरुणांनी महिलेच्या गळ्यातील 30 हजार रुपये किमतीचे 4 ग्रॅमचे मंगळसूत्र हिसकावून दुचाकीवरून वायगावच्या दिशेने पळ काढला. घटनेनंतर महिलेने वलगाव पोलिस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दिली. पोलिसांनी दोन चेन स्नॅचरर्सविरुद्ध कलम 309 (4), 3 (5) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.



## 'ऑटो'तून प्रचार

**अमरावती– बडनेरा विधानसभा मतदारसंघाच्या अपक्ष उमेदवार प्रिती संजय बंड या आपले बोधचिन्ह असलेल्या 'ऑटो' मध्ये बसून मतदारांच्या भेटीला जात आहे. प्रचारात फिरणाऱ्या धनाढ्य प्रस्थापितांच्या कोट्यवधी रुपयांच्या गाडी विरुध्द ऑटो असे चित्र या मतदारसंघात उभे ठाकत आहे. ( छायाचित्र मनिष जगताप )**

# बच्चू कडू परिवर्तनवादी नेतृत्व-सत्यपाल महाराज

## शिरजगाव बंड येथे समाजप्रबोधनाचा कार्यक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार ( दि.13 )**– मागील 20 वर्षात बच्चू कडू यांनी अनेक अंधश्रद्धा मोडीत काढत, बहिरम सारख्या ठिकाणी असलेली लावणी बंद करून अनेकांचे कुटुंब उद्ध्वस्त होण्यापासून वाचवले. अचलपूर मतदार संघातील जनता सुजाण आणि सुशिक्षित आहे, त्यांनी बच्चू कडू यांना चार वेळा आमदार म्हणून विधानसभेत पाठवले. गोरगरीब, दिव्यांग व्यक्तीची सेवा करणारा आणि शेतकऱ्यांची बाजू सभागृहात मांडणारा नेता आपल्याला पाहिजे तर बच्चू कडू यांच्या सारखा दुसरा पर्याय महाराष्ट्रात नाही संघर्ष आणि गरिबीचे चटके सहन करणारा बच्चू कडू परिवर्तनवादी नेतृत्व असल्याने जनतेने बच्चू कडू यांना पुन्हा संधी द्यावी असे आवाहन समाजप्रबोधनकार सत्यपाल महाराज यांनी केले.

मंगळवारी शीरजगाव बंड



येथे सत्यपाल महाराज यांच्या समाजप्रबोधनाचा कार्यक्रम पार पडला.यावेळी ते बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की,जात – धर्म रंग ,गरीब श्रीमंत असा भेदभाव न ठेवता मागील वीस वर्षापासून सतत अपंग,शेतकरी,कष्टकरी, सामान्य जनतेच्या हक्कासाठी सक्रिय समाजकारण करणारे ते नेते युवा वर्गाचे आयकॉन असलेले बच्चू कडू यांना तुमच्या सहकार्याची गरज असून आपण त्यांना मतरुपी आशीर्वाद द्यावे साद देखील सत्यपाल महाराज यांनी उपस्थितांना घातली.

शिरजगाव बंड येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथें मंगळवारी सायंकाळी 7 वाजता छावा संघटने द्वारा आयोजित समाज प्रबोधन कार्यक्रमास सत्यपाल महाराजांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी सत्यपाल महाराज यांनी आपल्या कीर्तनात म्हटले की, मी हिंदू तो मुसलमान असे मतभेद न ठेवता जो सर्वांसाठी कामात येईल त्याच्यासोबत आपण भक्कमपणे उभे राहिले पाहिजे. तसेच महिलांनी कोणत्याही महाराजांच्या नादी न लागता आपल्या घरीच नवऱ्याची सेवा करावी तसेच त्यांनी समाजाविषयी आपले विचार व्यक्त करतांना असे म्हटले की समाजासाठी नेहमी आपण कशा प्रकारे पुढे येऊन काम करू शकतो याची जाणीव करून देणे म्हणजे एक चांगला सुदृढ समाज निर्माण करणे आहे. समाजासाठी नेहमी आपण झटत राहिले पाहिजे. कारण ज्या समाजात आपण वावरतो त्या समाजाची ओळख ही आपल्यामुळे असते आणि आपणच जर रस्ता विसरलो आणि जातीभेद मध्ये हिंदू मुस्लिम यात अडकलो तर मोठे नुकसान होईल असेही ते म्हणाले यावेळी शिरजगाव बंड, आखतवाडा, प्रल्हादपूर, जमापूर येथील गावकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

# दोन वाहनांमधून 2.51 कोटी रुपयांची रोख जप्त

### मालवीय चौक आणि श्याम चौकातील घटना

### गुन्हे शाखा युनिट एकची कारवाई





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.13 )** – गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने बुधवारी दुपारी शहरातील मालवीय चौक आणि श्याम चौकात दोन वाहनांमधून सुमारे 2 कोटी 51 लाख रुपयांची रोकड जप्त केली. रोख रकमेबाबत दस्तावेजांची तपासणी आणि चौकशी सुरू आहे. सध्या ही रोकड कोतवाली पोलिस ठाण्यात ठेवण्यात आली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखेचे पथक कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मालवीय चौक आणि श्याम चौकात वाहनांची तपासणी करत होते. यावेळी पोलिसांना रेडियंट कॅश मॅनेजमेंट सर्व्हिसचे वाहन संशयास्पद वाटले. पोलिसांनी वाहनाला थांबवून तपासणी केली असता त्यात मोठी रोकड आढळून आली. त्यामुळे दोन्ही वाहने कोतवाली पोलिस ठाण्यात आणण्यात आली. एका वाहनात क्यूआर कोड सिस्टीम नसल्याचे दिसून आले, तर दुसऱ्या वाहनात अधिकृतपणे अपडेट केलेली क्यूआर कोड व दस्तावेज असल्याचे दिसून आले. या तपासणीदरम्यान एका वाहनात 36 लाख रुपये तर दुसऱ्या वाहनात 2 कोटी 15 लाख रुपये असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. प्राप्त झालेली 2 कोटींहून अधिक रक्कम येस बँकेची असल्याचे समोर आले आहे. अन्य वाहनात सापडलेली 36 लाखांची रक्कम रेडियंट कॅश मॅनेजमेंट सर्व्हिसच्या विविध ग्राहकांची असल्याचे पोलिसांनी सांगितले. सध्या पोलिसांनी दोन्ही रोख रक्कम जप्त करून कोतवाली पोलिस ठाण्याच्या ताब्यात दिली आहे. सर्व संबंधित कंपनीला आवश्यक कागदपत्रांची पूर्णता करण्यास सांगण्यात आले आहे.

### रोख रकमेची पडताळणी सुरु

गुन्हे शाखा युनिट एक आणि पोलिसांच्या पथकाने मालवीय चौक आणि श्याम चौक येथून दोन वाहनांमधून 2 कोटी 51 लाख रुपयांची रोकड जप्त केली आहे. यापैकी एका वाहनातून जप्त केलेली रोकड येस बँकेची असल्याचे सांगण्यात येत आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण करून संबंधितांना कळवल्यानंतर रोख रकमेची पडताळणी केली जाईल.

**गणेश शिंदे,**
**पोलिस उपायुक्त**

### विशेष पथकाने 4.58 लाख रुपये जप्त केले

बुधवारी विशेष पथक सिटी कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीत तडीपार, जुगार अड्डे, अवैध दारू तसेच विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने कोणी पैसे घेऊन जात आहे का ?, याचा शोध घेत होते. दरम्यान विशेष पथक कोतवाली पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना राजकमल चौकात एक तरुण संशयास्पद स्थितीत रोकड घेऊन जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी घटनास्थळ गाठून तरुणाची चौकशी केली. त्याने जिया उल्ला खान समीर उल्ला खान (44, रा. सुन्नी मशिदीजवळ, ताज नगर) असे त्याचे नाव उघड केले. तरुणाची झडती घेतली असता एका बॅगेत ठेवलेले 4 लाख 58 हजार 500 रुपये दिसले. या रकमेबाबत चौकशी केली असता ही रक्कम कारखान्याची असल्याचे त्यांनी सांगितले. त्याची पावती नसल्याचे सांगण्यात आले. कोणत्याही प्रकारची पावती नसल्याने पोलिसांनी निवडणूक आयोगाच्या नियमानुसार ही रक्कम जप्त करून सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात जमा केली.

# जनतेचे प्रेम आणि विश्वास लाख मोलाची शिदोरी - डॉ.विश्वकर्मा



**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे,( दि.13 )** – लोकांचे माझ्यावरील प्रेम आणि त्यांचा विश्वास ही माझ्यासाठी लाख मोलाची शिदोरी आहे. मी जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. परमेश्वराने माझ्या मागे जी भक्कम साथ उभी केली ही निरंतर टीकेल, असे अभीवचन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. निलेश विश्वकर्मा यांनी धामणगाव रेल्वे तालुक्यातील गावात प्रचार रॅली दरम्यान केले.

धामणगाव रेल्वे मतदार संघातील वंचित बहुजन आघाडीचे यांच्या प्रचारार्थ झाडा, आष्टा, चिंचोली, झाडगाव, गिरोली, बोरगाव धांडे, भातकुली, भोखड, उसळगव्हाण येथील प्रचार रॅलीत हजारो नागरिकांनी उपस्थिती लावून डॉ. निलेश विश्वकर्मा यांना समर्थन दिले. मतदार संघातील प्रत्येक गावात उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याने डॉ. निलेश विश्वकर्मा या वेळी विजयी येतील अशी असा विश्वास त्यांच्या समर्थकांनी व्यक्त केला आहे. 'अबकी बार निलेश विश्वकर्मा आमदार' असे नारे जनता लावत आहे. त्यांच्या प्रचार यात्रेत वाढत असलेली गर्दी पाहून विरोधकांचे धाबे दणाणले आहे. डॉ.निलेश विश्वकर्मा केवळ जिल्ह्यापुरते मर्यादित नसून राज्याचे नेतृत्व करण्याची क्षमता त्यांच्यात आहे, त्यामुळे त्यांना भक्कम साथ देत विजयी करणार असल्याचे विश्वास नागरिक दृढ करित आहेत. धामणगाव रेल्वे मतदार संघाचा अद्यापपर्यंत विकास झालेला नाही, कुठलेही मोठे उद्योग नाही, बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे, महिला वरील अत्याचाराचे प्रमाण वाढले, गुंडगिरीने तोंड वर काढले आहे याला आळा घालण्यासाठी राज्य व केंद्र सरकार सब सेल अपयशी ठरले आहे. याचा बंदोबस्त करण्यासाठी यावेळी मला विधान सभेवर पाठवा असे आवाहन डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी केले. प्रचार रॅली दरम्यान गावातील महादेव गुहे, रोषण राउत, भीमराव मनटे, मंगेश ठाकरे, भारत उके, सचिन चौधरी, दिलीप डोखने, साहेबराव वाहने ,राहुल मराठे , राजेश माने, राजेश पाटील, यांच्या सह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# 16 उमेदवारांचा खर्च सादर

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती** – दर्यापूर विधानसभा मतदारसंघात नामनिर्देशित उमेदवारांच्या खर्चाची दुसरी तपासणी सोमवार, दि. 11 नोव्हेंबर रोजी नवीन तहसिल इमारतीमध्ये पार पडली. यावेळी सर्व 16 उमेदवारांनी खर्च सादर केला.

दुसरी तपासणी खर्च निरीक्षक डॉ. उमा माहेश्वरी यांचे मार्गदर्शनाखाली पार पडली. लेख्यांच्या तपासणीवेळी एकूण 16 उमेदवारांपैकी 16 उमेदवार उपस्थित राहिले. सदर खर्च तपासणीवेळी खर्च नोंदवहीत





नोंदविलेला खर्च व खर्च सनियंत्रणन पथकाव्दारे नोंदविण्यात आलेला खर्च यात असलेली तफावत उमेवारांनी मान्य करून उमेदवारांच्या खर्च लेख्याचा ताळमेळ घेण्यात आला. उमेदवारांच्या लेख्याची तिसरी तपासणी दि. 15 नोव्हेंबर रोजी नविन तहसिल इमारत दर्यापूर येथील सभागृहात होणार आहे.

# सावंगा विठोबा नगरीत 'चंदन उटी' आणि 'कार्तिक मास मांड वाढवा'

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे( दि.13 )** – तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे दिनांक 15 नोव्हेंबर 2024 शुक्रवारला सकाळी 7.00 वाजता संस्थानमध्ये 'पंचक्रोशी कार्यक्रम', दुपारी 4 वाजता संस्थानच्या वतीने 'कार्तिक पौर्णिमा' निमित्त 'चंदन – ऊटी कार्यक्रम' आणि रात्री आरतीनंतर 'कार्तिक मास काकडा समाप्ती' इत्यादी कार्यक्रम संस्थानमध्ये आयोजित करण्यात आलेले आहेत.

संस्थान तर्फे चंदनउटी नंतर



बाहेर गावावरून येणारे भाविक-भक्त आणि समस्त गावकरी मंडळी करिता 'भव्य महाप्रसाद कार्यक्रम' संस्थानचे अन्नदान समितीच्या नियोजनात आयोजन करण्यात आले आहे. संस्थानमध्ये दि.16 नोव्हेंबर 2024 शनिवार रोजी सकाळी 8 वाजता संस्थानमध्ये 'कार्तिक मास' निमित्त 'अखंड जागृती भजन मांडीचा वाढवा' कार्यक्रम अरज आणि आरतीने विश्वस्त मंडळ आणि भाविक भक्तांचे उपस्थित संपन्न होत आहे. तरी सर्व भाविक-भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, अशी विनंती संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल सर्व विश्वस्त विनायक पाटील, वामण रामटेके, गोविंद राठोड, दिगांबर राठोड, अनिल बेलसरे, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, वैभव मानकर, स्वप्निल चौधरी विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

# नशामुक्त तरुणाई जनजागृती

**अमरावती**– नेहरु युवा केंद्रातर्फे धामणगांव रेल्वे येथील आदर्श महाविद्यालयात नशामुक्त तरुणाई, जागरूकता आणि शिक्षण कार्यक्रम पार पडला. प्राचार्य डॉ. सुधीर बायस्कर अध्यक्षस्थानी होते. डॉ. मुकुंदराव पवार स्कूलच्या वसतिगृहाचे अधीक्षक ग्रामगिताचार्य हनुमंतदादा ठाकरे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. दिपक श्रृंगारे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाला डॉ. संजय पाटील, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहूकर, प्रा. विलास नागोसे, प्रा. विशाल मोकाशे, प्रा. समीक्षा वानखडे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी वैष्णवी राठोड, सुवर्णा वंजारी, मैथिली वैद्य, स्नेहल पतालिया, विद्या बोबडे, महेंद्र काळे, भूमेश्वरी ठोंबरे यांनी पुढाकार घेतला. तानिया टेकाम हिने सूत्रसंचालन केले.

## सार्वजनिक सूचना

माझ्या पक्षकाराने दिलेल्या माहिती आणि अधिकार आणि कागदपत्रांच्या आधारे, मी सर्व लोकांसाठी ही सार्वजनिक नोटीस जारी केली आहे, की दिनांक 10/11/1995 च्या खरेदी खताची मूळ प्रत अंबादास गुणवंतराव तायडे विक्रेता म्हणून आणि विनायकराव रंगरावजी हिवसे खरेदीदार म्हणून दरम्यान अंमलात आणली गेली आहे. हे खरेदीखत चांदुर बाजार च्या सब रजिस्ट्रारकडे रीतसर नोंदणीकृत असलेले अनुक्रमे नोंदणी क्रमांक 2463 दिनांक 10/11/1995 असुन सदर खरेदी खताची मुळ प्रती हरवली आहे. ह्या नोटिस द्वारे सर्वत्र लोकांस कळविणेत येते की ज्या कुणाचा ह्या खरेदी संबंधात कोणताही हितसंबंध किंवा हक्क वा उजर किवा ताबा असेल तसेच कर्ज असेल किंवा अधीकार असेल त्याकरीता नोटिस प्रकाशीत झालेपासुन (07 (सात) दिवसाचे आत खालील पत्यावर माहीती वा संबंधीत कागदपत्रांचा पुरावा सादर करावा. ह्यानंतर कोणताही आक्षेप विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी

शिक्का

**स्वाक्षरी**
**ॲड. प्रविण भुस्कडे**
**सांगेकर नगर भक्तिधाम रोड**
**चांदूर बाजार जि. अमरावती.**
**मो. क्रमांक 8788355988**

# मोर्शी वासियांना भावी आमदारांकडून अपेक्षा

## निधी आणला, मात्र विकास अदृष्य

**अंबादास सिनकर**

**मोर्शी,( दि.13 )**– विद्यमान आमदार निधी आणल्याचा गवगवा करतात, मात्र त्यांचा विकास अदृष्य आहे. त्यांनी कोणता विकास केला हे, ते स्वत- व्यवस्थित सांगू शकत नाही. त्यामूळे भावी आमदारांनी नागरिकांच्या मागणीनूसार विकास करावा अशी अपेक्षा मोर्शीवासी करित आहे.

शेतीमालावरील तसेच फळ पिकावरील प्रक्रिया प्रकल्प अद्यापही चालू झालेला नाही. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना केवळ भूमिपूजन झालेला संत्रा प्रक्रिया प्रकल्प अद्यापही कागदावरच आहे. केवळ जैन उद्योग समूहाला जागा आवंटीत केली आहे. नागरी सुविधांचा अभाव आहे गावातील रस्त्यांची दयनीय दशा आहे. मोर्शी शहरात एखाद्या सांस्कृतिक भवन उभारल्या गेले नाही. त्यापासून नगरपरिषद ला उत्पन्न मिळवता आली असते. मूलभूत सुविधांवर भर देऊन येणाऱ्या आमदाराने निधीचे योग्य नियोजन करून अमलबजावणीची गरज आहे.

मोर्शी विधानसभा मतदारसंघात गेल्या पाच वर्षात सर्वात जास्त निधी आणल्याचे सांगितल्या जात असले तरी शाश्वत विकास झाला नाही. या मतदारसंघात कृषी विकासाच्या दृष्टीने कामे झाली नाही. सिंचनाचे कोणतेही नवीन प्रकल्प आले नाहीत.



**डॉ. प्रदीप कुऱ्हाडे,**
**नागरिक, मोर्शी.**

200 बेडचे भले मोठे रुग्णालय बांधकाम सुरू असून त्यामध्ये पुरेसा कर्मचारी वर्ग असला पाहिजे रुग्णांना अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह सेवा मिळाली पाहिजे, फक्त बांधकामे होऊन चालणार नाही असे सांगितले. मोर्शी एसटी डेपो ते रेल्वे स्टेशन हा रस्ता होणे गरजेचे आहे. मोर्शी शहराला बायपास ची गरज आहे. मोर्शी शहरातील वन विभागाने बनवलेले गार्डन पर्यंत एसटी डेपो पासून रस्त्याची गरज आहे, तो रस्ता अपूर्ण आहे. शहरातील रस्त्यांची अवस्था दयनीय आहे. येणाऱ्या आमदाराने या सर्व बाबींची गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे.



**सुरेशराव टवलारे, सामाजिक कार्यकर्ते, मोर्शी.**